# मेट्रो-३ एकात्मिक प्रवासी कार्ड

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा-सिप्झ मेट्रो-३ मार्गावर भविष्यात प्रवास करणाऱ्या प्रवाशांना एकात्मिक प्रवासी कार्ड मिळणार असून त्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन बँकिंग भागीदार शोधात आहे.

मेट्रो-३ चा मार्ग अनेक ठिकाणी मोनोरेल तसेच पूर्व व पश्चिम रेल्वेच्या काही स्थानकांना जोडला जाणार आहे. म्हणजे मेट्रो-३चे प्रवासी अन्य मेट्रो स्थानकांमध्ये थेट प्रवेश करतील. त्यानंतर ते या मार्गांचा वापर करून पुढील प्रवास करतील. या प्रवासात त्यांना प्रत्येक वेळी तिकीट काढावे लागू नये यासाठी हे कार्ड सोयीचे ठरणार आहे.

> **स्वयंचलित तिकीट प्रणालीमुळे प्रवाशांना तिकिटासाठी रांगेत उभे राहण्याचीही गरज भासणार नाही. ऑनलाईन तिकीट काढून ते स्कॅन करून मेट्रो स्थानकात प्रवेश करता येईल.**

मेट्रोचा पहिला टप्पा आरे ते कुलाबा असा असेल. त्यानंतर काम पूर्ण झाल्यानंतर दुसरा टप्पा सुरू होईल. त्यापूर्वी हे कार्ड मिळावे असा प्रयत्न आहे.

आतापर्यंत अनेक बदल आणि सुधारणा सुचवण्यात आल्याने अद्याप एकात्मिक कार्ड प्रणाली अस्तित्वात येऊ शकलेली नाही.